

सत्यमेव जयते



# संस्मरण पुष्प

महाराष्ट्राच्या आणि देशाच्या प्रगतीसाठी बहुमूल्य योगदान देणाऱ्या चार महनीय नेत्यांचं सन २०२० हे जन्मशताब्दी वर्ष. भविष्यावर नजर ठेवत मार्गक्रमण करताना पूर्वसुरींचं हे पहाडासारखं कार्य आपल्याला प्रेरणा देतं आणि दिशाही दाखवतं. महाराष्ट्र विधिमंडळाच्या गौरवशाली परंपरेतील या चार महनीय नेत्यांच्या कार्यकर्तृत्वाचं संस्मरण व्हावे, यासाठीच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून, हे शब्दपुष्प पुस्तिका स्वरूपात सादर...


✣ संकलन आणि संपादन ✣

वि. स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई

सत्यमेव जयते

# संस्मरण पुष्प


**संकलन आणि संपादन**

वि. स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई

## विधिमंडळ म्हणजे लोकशाहीचे महामंदिर ...

"विधिमंडळ हे लोकशाहीचे महामंदिर आहे. जनताजनार्दन ही त्याची स्वयंभू, सार्वभौम देवता! प्रतिनिधी हे त्या देवतेचे उपासक. त्या उपासकांचे सेवासाधनेचे माध्यम म्हणजेच विधिमंडळातील चर्चा. सत्ता आणि सेवा, विरोध आणि विनोद, शक्ती आणि युक्ती, वाद आणि संवाद, कर्तृत्व आणि वक्तृत्व, मान आणि इमान, नय आणि विनय, निष्ठा आणि प्रतिष्ठा, सवाल आणि जवाब, आवेश आणि आर्जव इत्यादी गोष्टींचा पावन संगम या विधिमंडळात अनुभवावयास मिळतो."

**-श्री. बाळासाहेब भारदे**
माजी अध्यक्ष, विधानसभा



जन्म : १४ जुलै, १९२०
मृत्यू : २६ फेब्रुवारी, २००४

# डॉ. शंकरराव भाऊराव चव्हाण

**कणखर प्रशासक,**
**अभ्यासू संसदपटू आणि मराठवाड्याचे भगीरथ !**

डॉ. शंकरराव भाऊराव चव्हाण यांचा जन्म १४ जुलै, १९२० रोजी औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण येथे झाला. त्यांचे शिक्षण बी. ए. एलएल. बी. पर्यंत झाले होते.

डॉ. चव्हाण यांचे प्राथमिक शिक्षण पैठण मध्ये झाल्यानंतर, पुढील शिक्षणासाठी ते हैदराबादला गेले. कायद्याची पदवी प्राप्त केल्यानंतर, त्यांनी काही काळ वकिली व्यवसाय केला. स्वामी रामानंद तीर्थ यांच्या सानिध्यात आल्यानंतर त्यांनी हैदराबाद मुक्तीसंग्रामात स्वतःला झोकून दिले. याच काळात हैदराबाद स्टेटच्या काँग्रेसमध्ये त्यांची सचिवपदी निवड झाली. हैदराबाद सहकारी बँकेचे संचालक व हैदराबाद सहकारी संघाचे सदस्य म्हणून त्यांनी कार्य केले. नांदेड नगरपरिषदेचे अध्यक्ष, नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष, शारदा भवन एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलपती, भारत स्काऊट ॲण्ड गाईडचे अध्यक्ष म्हणून त्यांनी उत्तम कार्य केले.

डॉ. चव्हाण हे १९५६ व १९८६ असे दोन वेळा महाराष्ट्र विधानपरिषदेवर तसेच १९५७, १९६२, १९६७, १९७२ व १९७८ असे पाच वेळा महाराष्ट्र विधानसभेवर निर्वाचित झाले होते. सन १९८० व १९८४ असे दोन वेळा ते लोकसभेवर तर १९८८, १९९० व १९९६ असे तीन वेळा राज्यसभेवरही निर्वाचित झाले. १९५६ ते १९७९ या काळात राज्य मंत्रीमंडळामध्ये त्यांनी अनेक खात्यांचे मंत्री म्हणून उत्तम कार्य केले. पाटबंधारे, ऊर्जा, नगरविकास, कृषी, अर्थ व नियोजन अशा विविध खात्यांचे मंत्री म्हणून त्यांनी आपल्या कार्याची छाप पाडली. १९७५ ते १९७७ व १९८६ ते १९८८ या कालावधीत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली. महाराष्ट्र राज्यातील जायकवाडी, विष्णूपुरी, उर्ध्व पैनगंगा, अप्पर मांजरा असे विविध प्रकल्प राबवून जास्तीत जास्त जमीन ओलीताखाली आणण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी विशेष योगदान दिले. केंद्र सरकारमध्ये १९८० ते १९९६ या कालावधीत शिक्षण, परराष्ट्र व्यवहार, संरक्षण, गृह, अर्थ या खात्यांचे मंत्री म्हणून त्यांनी प्रभावी कार्य केले. त्यांच्या कारकिर्दीतील ऑपरेशन ब्ल्यू स्टार तसेच पंजाब व आसाम करार हे देशात शांतता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरले आहेत. केंद्रीय नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष तसेच संसदेच्या विविध समित्यांचे समिती प्रमुख म्हणून त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. त्यांनी आपल्या प्रदीर्घ राजकीय व सार्वजनिक जीवनामध्ये कणखर प्रशासक, अभ्यासू संसदपटू आणि स्वच्छ कारभार याद्वारे आपल्या कार्याचा ठसा देश पातळीवर उमटविला.




## विधानसभेच्या कार्यवृत्तातील निवडक संस्मरणपुष्प...

**श्री. सुशीलकुमार शिंदे (मुख्यमंत्री)** : स्वामी रामानंद तीर्थ यांच्या संपर्कात आल्यानंतर वकिली सोडून हैदराबाद मुक्ती आंदोलनात त्यांनी स्वतःला झोकून दिले. कै. चव्हाण यांच्या कारकिर्दीतील जायकवाडी, विष्णुपूरी, उर्ध्व पैनगंगा, एलदरी व सिद्धेश्वर या धरणांमुळे मराठवाड्यासाठी विकासाचे भगीरथ अशी त्यांची इतिहासात नोंद राहणार आहे. मराठवाड्याच्या एकूणच विकासासाठी अपूर्व योगदान त्यांनी दिले आहे. त्यांचा भर सदोदित भक्कम आणि विधायक कार्यावरच होता. त्यांनी आपल्या प्रदीर्घ राजकीय व सार्वजनिक जीवनामध्ये कणखर प्रशासक, अभ्यासू, परखड व स्पष्टवक्ते नेते आणि उत्कृष्ट संसदपटू असा आपला ठसा राज्यभर व देशभर उमटवला आहे. मला आठवते की, सन १९७४ च्या कै. वसंतराव नाईक मंत्रिमंडळामध्ये मला घेण्यात आले होते. तीन महिन्यानंतर ते मंत्रिमंडळ बदलले. कै. शंकरराव चव्हाण हे मुख्यमंत्री म्हणून आले. मी तीन महिने अगोदरच्या मंत्रिमंडळामध्ये काम केलेले असल्यामुळे त्यांनी मला त्यांच्या मंत्रिमंडळात घेतले आणि एकदम सहा खाती माझ्याकडे दिली. नवीन चॅलेंजिंग वर्क स्वीकारण्याची संपूर्ण जबाबदारी कै. शंकरराव चव्हाण यांनी माझ्यावर सोपविली होती. आजच्या क्षणी त्यांनी राज्यमंत्री म्हणून माझ्यावर सोपविलेली जबाबदारी आठवल्याशिवाय रहात नाही.

**श्री. नारायण राणे (विरोधी पक्षनेता)** : कै. शंकररावजी चव्हाण यांच्या कारकिर्दीतील "ऑपरेशन ब्ल्यूस्टार" तसेच "पंजाब आणि आसाम" करार हे देशात शांतता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने त्यांच्या जीवनातील ही वैशिष्ट्यपूर्ण बाब होती. हे व्यक्तिमत्व या राज्याला शिखरापर्यंत घेऊन गेले आणि त्यांचे अनुकरण होणे जनतेकडून अपेक्षित आहे असे मला या ठिकाणी सांगावयाचे आहे. दिवंगत शंकरराव चव्हाण आज जरी आपल्यामध्ये नसले तरी त्यांच्या जीवनातील अनेक पैलू आदर्श स्वरुपामध्ये आपल्या समोर आहेत. दिवंगत शंकरराव यांच्या सुविद्य पत्नी कुसुमताई यांनी त्यांच्या आठवणी **"कुसुमांजली " या पुस्तक स्वरुपात शब्दबध्द केल्या आहेत.**

**श्री. एकनाथराव खडसे-पाटील (एदलाबाद)** : महाराष्ट्रातील तिजोरीतून शेतकऱ्यांचे कर्ज फेडण्यासाठी त्यांनी पहिल्यांदा ५० कोटी रुपये दिले. कै. शंकरराव चव्हाण यांची अशी भावना होती की, महाराष्ट्रातील शेतकरी हा कर्जमुक्त व्हावयास पाहिजे, त्यांच्यावरील जे ओझे आहे ते कमी व्हावयास पाहिजे. त्या कालखंडात ५० कोटी रुपये शासनाच्या तिजोरीतून शेतकऱ्यांचे कर्ज त्यांनी भरले.

**श्री. गणपतराव देशमुख (सांगोला)** : हैदराबाद मुक्ती संग्रामामध्ये कै. शंकरराव चव्हाण यांनी आपल्या राजकीय जीवनाची सुरूवात केली. ६० वर्षांपेक्षा अधिक काळ सामाजिक व राजकीय जीवनामध्ये घालवून या काळामध्ये महाराष्ट्रातील व देशातील अनेक महत्त्वाच्या पदांवर ते आरुढ झाले. त्या पदांवर काम करीत असताना अभ्यासू वृत्ती, स्वच्छ कारभार, शिस्तप्रिय ठाम भूमिका व निष्कलंक चारित्र्य ही त्यांच्या कारभाराची प्रमुख वैशिष्ट्ये होती.



त्यामुळे त्यांनी या राज्यामध्ये आणि देशामध्ये एक आगळा वेगळा ठसा उमटविलेला आहे.

**श्री. जीवा पांडू गावीत (सुरगाणा)** : सर्व आयुष्य जनतेच्या भल्यासाठी, जनतेशी निगडीत असलेले प्रश्न सोडविण्यासाठी तसेच देशाचे आणि राज्याच्या विकासाचे प्रश्न डोळ्यासमोर ठेवून त्यांची योग्य अंमलबजावणी करून ते प्रत्यक्षात उतरविणारे राजकारणी हे खरे देशभक्त असतात. या देशभक्तांच्या मालिकेतील असलेले देशभक्त म्हणजे कै. शंकररावजी चव्हाण.

**श्री. चंद्रकांत छाजेड (पर्यटन राज्यमंत्री)** : महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री कै. शंकरराव चव्हाण हे महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून सर्वांना परिचित होते. त्यांचा पुणे शहराशी अतिशय जवळचा संबंध होता. कै. शंकरराव चव्हाण हे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री होते, त्यावेळी पुणे शहराचा विकास व्हावा म्हणून त्यानी पुणे शहरात मंत्रिमंडळाची बैठक घेतली होती. त्यावेळच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये पुणे शहराचा विकास करण्यासाठी १९० कोटी रुपयांची योजना जाहीर केली होती.

**श्री. महोदराव शिवणकर (आमगाव)** : कै. चव्हाण साहेब थोर होते कारण ते विरोधी पक्षात असताना सुद्धा त्यांचा सल्ला घेतला जात होता आणि खरोखरच योग्य सल्ला देणारा माणूस होता. योग्य सल्ला देणारी जी माणसे होती त्यापैकी कै. शंकरराव चव्हाण हे एक होते.

**श्री. सुभाष वानखेडे (हदगाव)** : ५० वर्षे राजकारण करीत असताना उभ्या आयुष्यामध्ये अतिशय निःस्वार्थीपणाने काम केले आणि भ्रष्टाचाराचा एक धब्बासुद्धा या व्यक्तीच्या अंगावर कोणी उडवू शकला नाही, ही अतिशय अभिमानाची गोष्ट आहे.

**श्रीमती शोभाताई फडणवीस (सावली)** : कै. शंकरराव चव्हाण हे जेव्हा मुख्यमंत्री होते त्यावेळी मी जिल्हा परिषद सदस्य होते. प्रचंड दुष्काळ चंद्रपूर जिल्ह्यात पडला होता म्हणून मी मोठा मोर्चा काढला होता आणि जिल्हाधिकाऱ्यांना घेराव घातला. त्यावेळी त्यांनी फोन करून सांगितले की, घेराव उठवा, मी येत्या आठ दिवसात येऊन दुष्काळ मंजूर करतो. खरोखर आठ दिवसांनी सर्वसामान्य शेतकऱ्यांसाठी, त्यांना मदत करण्यासाठी, त्यांनी तेथे येऊन दुष्काळ जाहीर केला. प्रथमच आमच्या जिल्ह्याला पीक विमा योजनेचा लाभ मिळवून दिला.

**श्री. शशिकांत शिंदे (जावळी)** : कै. शंकरराव चव्हाण हे माथाडीला पाठबळ देणारे नेते होते आणि माथाडी कामगारांना ते मुख्यमंत्री असतांना खऱ्या अर्थाने त्यांनी ताकद व संरक्षण दिले.

**श्री. गोविंद केंद्रे (उदगीर)** : वाळवंटाचे नंदनवन करण्याचा कै. शंकरराव चव्हाण यांनी प्रयत्न केलेला आहे. समान पाणी वाटपाचे धोरण त्यांनीच महाराष्ट्रात आणलेले आहे.

**श्री. सुभाष साबणे (मुखेड)** : कै. शंकरराव चव्हाण गोदाकाठचे भगीरथपुत्र होते. मराठवाडा सुपीक व्हावा, सुजलाम-सुफलाम व्हावा म्हणून त्यांनी विष्णूपुरी प्रकल्प, जायकवाडी प्रकल्प, लेंडी प्रकल्प, उजनी प्रकल्प, मन्यार प्रकल्प उभे केले होते. संपूर्ण मराठवाडा नतमस्तक होईल असे काम कै. शंकरराव चव्हाण साहेबांनी केलेले आहे.




**श्री. रोहिदास चव्हाण (कंधार):** कै. शंकरराव चव्हाण हे एक अत्यंत शिस्तप्रिय, कर्तव्यनिष्ठ म्हणून परिचित होते. त्यांनी आयुष्यामध्ये वैयक्तिक कामापेक्षा विकासाच्या कामाला जास्त महत्त्व दिले. राज्याच्या हिताच्या दृष्टीने त्यांनी 'झिरो बजेट' चा निर्णय घेतला त्यावेळी त्यांच्या निर्णयाला बराच विरोध झाला. परंतु त्यांनी राज्याच्या हिताच्या दृष्टीने 'झिरो बजेट' राबविला. आम्ही त्यांना मराठवाड्याचे शिल्पकार म्हणून संबोधितो. जोपर्यंत राज्यातील शेतकऱ्यांना पाणी देऊ शकत नाही तोपर्यंत शेतकऱ्यांचा विकास होऊ शकत नाही ही जाणीव त्यांना होती आणि त्यादृष्टीने जायकवाडी, विष्णुपूरी, उर्ध्व पैनगंगा, एलदरी व सिध्देश्वर अशी धरणे त्यांच्या कारकिर्दीत झाली.

**श्री. दिगंबर भेगडे (मावळ) :** कै. शंकरराव चव्हाण यांचे नाव मी माझ्या लहानपणी ऐकले होते. ते राज्याचे मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी मराठवाड्याच्या विकासासाठी केलेल्या कार्याची नोंद इतिहासात राहणार आहे. त्यांनी आपल्या प्रदीर्घ राजकीय व सार्वजनिक जीवनामध्ये कणखर प्रशासक, अभ्यासू, परखड व स्पष्टवक्ते नेते आणि उत्कृष्ट संसदपटू असा ठसा राज्यभर व देशभर उमटवला आहे.

**श्री. अरुणभाई गुजराथी (अध्यक्ष) :** कै. शंकरराव चव्हाण हे एक अत्यंत शालीन आणि शानदार असे व्यक्तिमत्व होते. निर्मळ आणि निष्कांचन व्यक्तिमत्व म्हणून त्यांचा उल्लेख करता येईल. नेत्याने बांधलेल्या धरणातून शेतकऱ्यांना जेव्हा पाणी मिळते तेव्हा शेतकऱ्यांना त्या नेत्याचा चेहरा भाकरीमध्ये दिसत असतो. लोकांना भाकरीमध्ये कै. शंकरराव चव्हाण दिसतील असेच काम त्यांनी केलेले आहे. एकाने असे म्हटले आहे की, "We have towering personality, but small character.'' त्यांच्या संदर्भात मी सांगेन की, "We have towering personality with great character" अशा पद्धतीने कै. चव्हाण हे जीवन जगले.

## विधानपरिषद कार्यवृत्तातील निवडक संस्मरणपुष्प...

**डॉ. पतंगराव कदम (संसदीय कार्य मंत्री) :** कै. चव्हाण यांच्या कारकिर्दीतील जायकवाडी, विष्णुपुरी, उर्ध्व पैनगंगा, एलदरी व सिद्धेश्वर या धरणांमुळे मराठवाड्यासाठी विकासाचे भगीरथ अशी त्यांची इतिहासात नोंद राहणार आहे. मराठवाड्याच्या एकूणच विकासासाठी अपूर्व योगदान त्यांनी दिले आहे. त्यांचा भर सदोदित भक्कम आणि विधायक कार्यावरच होता. त्यांनी आपल्या प्रदीर्घ राजकीय व सार्वजनिक जीवनामध्ये कणखर प्रशासक, अभ्यासू, परखड व स्पष्टवक्ते नेते आणि उत्कृष्ट संसदपटू असा आपला ठसा राज्यभर व देशभर उमटवला आहे.

**श्री. नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर) :** स्वर्गीय शंकरराव चव्हाण यांच्या बाबतीत त्यांचा स्पष्टवक्तेपणा, निर्भीडपणा व प्रशासनाबद्दलची कठोरता या गोष्टी, समाज




आणि राष्ट्रहित समोर ठेवून त्यांनी वेळोवेळी कोणत्याही गोष्टींची चिंता न करता तशाप्रकारचे महाराष्ट्रामध्ये निर्णय घेतले. विशेषतः मराठवाड्याच्या विकासामध्ये महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून त्यांचा सिंहाचा वाटा आहे. महाराष्ट्राचा समतोल विकास व्हावा, महाराष्ट्रातील सर्व भागांना न्याय मिळावा, घटनेतील तत्त्वाप्रमाणे, माननीय राज्यपालांनी दिलेल्या आदेशाचे पालन सरकारने केले पाहिजे अशाप्रकारचा परखड, स्पष्टपणे व निर्विवादपणे विचार स्वर्गीय शंकरराव चव्हाण यांनी दाखविला. पॉप्युलर पॉलिटिक्सचा विचार न करता त्यांची तत्वाशी आणि त्याचबरोबर सामाजिक आणि राष्ट्रीय उद्दिष्टांशी कटीबद्धता ठेऊन वेळप्रसंगी त्याची किंमत मोजली. परंतु आपल्या कठोरतेच्या बाबतीत त्यांनी कधीही कॉम्प्रमाईज केले नाही. या त्यांच्या आदर्श गुणांची आठवण महाराष्ट्राला नेहमी होत राहील.

**श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले)** : कै. शंकरराव चव्हाण यांच्या संबंधीची एक गोष्ट सांगायची म्हणजे महाराष्ट्रात वैधानिक विकास मंडळे होऊ नयेत, अशाप्रकारची त्यांची स्पष्ट भूमिका होती. अशाच प्रकारची भूमिका मा. शिवसेना प्रमुखांची होती. शेवटी लोकांचा आग्रह झाल्यामुळे वैधानिक विकास मंडळे स्थापन झाली.

**प्रा. बी. टी. देशमुख (अमरावती विभाग पदवीधर)**: श्री. शंकरराव चव्हाण यांचा एकंदर प्रवास पाहिला तर तो प्रवास अतिशय कष्टाने आणि मेहनतीने त्यांनी पार पाडला आहे असे आपल्याला दिसून येईल. विधानपरिषदेतील दोन कार्यकाळ, विधानसभेतील तीन कार्यकाळ, लोकसभेतील दोन कार्यकाळ आणि राज्यसभेतील दोन कार्यकाळ अशी प्रदीर्घ संसदीय कारकीर्द त्यांची राहिली. स्पष्टवक्तेपणा, निर्भिडपणा आणि अभ्यासावर आधारित एखादे मत तयार झाले की ते ठामपणाने मांडणे हा त्यांचा गुण अनेकांना माहित आहे. विकासावर आधारित नेतृत्व करणे ही अतिशय कष्टाची गोष्ट असते आणि ते त्यांनी कष्टपूर्वक केले.

**श्रीमती सुधा जोशी (नामनियुक्त)**: श्री. शंकरराव चव्हाण यांना प्रशासकीय कामकाजाचा दांडगा अनुभव होता. त्या अनुभवातून शुन्याधारित अर्थसंकल्पाची कल्पना पुढे आली आणि त्यांनी ती राबविली. त्यांच्या करड्या शिस्तीच्या स्वभावामुळे लोक त्यांना हेडमास्तर म्हणत असत. त्यांची प्रशासनावर पकड होती. कोणताही अधिकारी एखाद्या विषयाची संपूर्ण माहिती घेतल्याशिवाय किंवा अभ्यास केल्याशिवाय त्यांच्यापुढे जात नसे. फक्त प्रशासनावरच नव्हे तर आमदार आणि कार्यकर्त्यांवर देखील त्यांचा वचक होता.

**श्री. जयंत पाटील (विधानसभेने निवडलेले)**: पैठणसारख्या संतांच्या भूमीत १४ जुलै, १९२० रोजी मा. शंकररावजींचा जन्म झाला. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात आणि मराठवाड्याच्या मुक्ती संग्रामात अग्रभागी असलेले शंकरराव कायद्याचे गाढे अभ्यासक होते. शैक्षणिक क्षेत्रात, सहकार क्षेत्रात आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये उत्तम कामगिरी करून ते राज्याचे दोन वेळा मुख्यमंत्री झाले. केंद्रात त्यांनी अनेक महत्त्वाची मंत्रीपदे भूषविली आणि त्या पदांना योग्य न्याय दिला.



**श्री. गंगाधर पटने (विधानसभेने निवडलेले) :** अनुशेषासंदर्भात कै. शंकरराव चव्हाण यांचा अनेकदा उल्लेख होत आलेला आहे. आणखी एका गोष्टीचा उल्लेख मी करू इच्छितो. दोन अपत्यांवर संतती होता कामा नये यादृष्टीने कुटुंब नियोजनाच्या संदर्भात क्रांतीकारक बिल त्यांनी आणले. त्यावेळी अनेकांनी त्यांची खिल्ली उडविली. आज सगळ्या विकासाच्या प्रक्रिया आणि विकास कामे निगेटीव्ह होतात त्यावेळेस त्यांच्या या बिलाची आठवण झाल्याशिवाय रहात नाही. त्यांच्याकडे कोणताही विकासाचा प्रश्न घेऊन गेलो तर ते त्यांस अनुकूल अभिप्राय लिहित असत आणि ते होईल असे पहात असत. त्यामुळे राजकीय मतभेद असले तरी लोकांनासुद्धा त्यांचे स्मरण कायम होत रहाणार आहे.

**श्री. उल्हास पवार (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) :** वाळवंटामध्ये एखादे ओऍसिस असावे असे व्यक्तिमत्व स्वर्गीय शंकरराव चव्हाण साहेबांचे होते. ते स्वच्छ चारित्र्याचे आदर्श नेते होते. फटकळपणा, जो लोकशाहीमध्ये ज्या काळामध्ये न परवडणारा असताना व सवंग लोकप्रियतेकडे वाटचाल चालू असताना आणि ज्यावेळेस आपली मते अत्यंत प्रामाणिकपणे, परखडपणे, निर्भिडपणे मांडणे हे अभावानेच आढळते त्यावेळी तो स्पष्टवक्तेपणा स्वर्गीय शंकरराव चव्हाणसाहेबांकडे होता. संपूर्ण राजकारण, समाजकारणामध्ये मार्गदर्शक तत्वप्रणाली सभागृहात आणि सभागृहाच्या बाहेर कशी असावी यासंबंधी मौलिक सूचना स्वर्गीय चव्हाणसाहेबांनी केल्या. त्यांचा अमृत महोत्सव पुण्यामध्ये करण्याची संधी मला मिळाली. त्या कार्यक्रमाचा मी संयोजक होतो. सर्व पक्षीय असा एक अत्यंत देखणा सुंदर समारंभ पुण्यामध्ये झाला. केंद्रीय मंत्री म्हणून पंजाब आणि जम्मू काश्मीरमधून निवडणूका होऊ शकणार नाहीत अशा प्रकारचे वातावरण असताना ते आव्हान या देशाचे गृहमंत्री म्हणून त्यांनी स्वीकारले आणि ते साकार करून दाखविले.


**श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) :** प्रथमतः शंकरराव चव्हाण हे वैधानिक विकास मंडळाच्या विरोधात होते. वैधानिक विकास मंडळातून शंभर टक्के मागास भागाच्या विकासाची दारे उघडण्याची शक्यता आहे असे जेव्हा त्यांना समजले तेव्हा ते स्वतः त्या संबंधातील सभेला आले आणि माननीय राज्यपालांना धन्यवाद देण्यासाठीदेखील ते आले. हा त्यांच्या मनाचा मोठेपणाच आहे.

**श्री. वसंत डावखरे (उप सभापती) :** शंकररावांचा आणि माझा परिचय राजकीय असला तरी काही काळातच त्याचे रुपांतर कौटुंबिक संबंधात झाले. मला त्यांनी वडिलांची माया दिली. शंकररावांबद्दल बोलत असताना अनेक वक्त्यांनी असे सांगितले की, शंकरराव हे कडक शिस्तीचे होते. आता ही वस्तुस्थिती आहे परंतु त्याच बरोबर ते कनवाळू हृदयाचे होते. याचा मला अनेक वेळा अनुभव आला आहे. देशाच्या राष्ट्रीय पातळीवर त्यांनी विविध पदे भूषविली. महाराष्ट्रातील सर्व पक्षांना आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना त्यांचे कार्य दीपस्तंभासारखे मार्गदर्शक आहे.




**प्रा. ना. स. फरांदे (सभापती) :** जायकवाडी प्रकल्पाच्या बाबतीत तत्कालीन तज्ज्ञांनी अडथळे आणले होते. पण कै. शंकरराव चव्हाण यांनी तेव्हा ठणकावून सांगितले की, हे निकष कोणत्या काळातील आहेत? तर या देशावर राज्य करण्यासाठी आलेल्या ब्रिटीशांच्या काळातील हे निकष आहेत आणि हे निकष स्वातंत्र्योत्तर काळामध्ये लावण्याची कोणत्याही प्रकारची आवश्यकता नाही. तीच गोष्ट विष्णुपूरीच्या बाबतीत देखील आहे. हे दोन प्रकल्प म्हणजे एक प्रकारे कै. शंकररावजींच्या कार्याचे प्रतीक आहेत. राजकारणामध्ये गुळगुळीत, मुळमुळीत, सुळसुळीत, चुळमुळीत, बुळबुळीत असे बोलण्याच्या सवयी आहेत. उलट असे बोलणे म्हणजेच यशस्वी राजकारण, असे बोलणे म्हणजे जणूकाही चांगले नेतृत्व देणे. पण कै. शंकरराव चव्हाण यांच्या बाबतीत पाहिले तर कुठलाच "ळ" मग तो गुळगुळीत मधलाही नाही. बुळबुळीत मधलाही नाही. सुळसुळीत मधलाही नाही. चुळमुळीत मधलाही नाही. तर जे काही आहे ते कोणाला कितीही कठोर वाटो. पण जे खरे आहे, आवश्यक आहे त्याचा त्यांनी आग्रह धरला आणि तो आग्रह धरल्यामुळे कोणाला काय वाटते, कोण किती दुखावेल याचा त्यांनी कधीही विचार केला नाही. हे एक प्रकारचे राजकारणातील शंकरसूत्र, ही एक प्रकारची राजकारणातील शंकरनीती होती.

(संदर्भ : विधानसभा, विधानपरिषद कार्यवृत्त - शोक प्रस्ताव दिनांक १५ मार्च, २००४)



जन्म : ७ नोव्हेंबर, १९२०
मृत्यू : २२ऑगस्ट, २००९

# श्री. यशवंतराव जिजाबा मोहिते

**सहकार महर्षी आणि कापूस एकाधिकार योजनेचे जनक**
**"गाव तिथे रस्ता व रस्ता तिथे एसटी"**
**"कसेल त्याची जमीन"**

श्री. यशवंत जिजाबा मोहिते यांचा जन्म ७ नोव्हेंबर, १९२० रोजी सातारा जिल्ह्यात रेठरे (बु) येथे झाला. त्यांचे शिक्षण इन्टर पर्यंत झाले होते.

श्री. मोहिते यांनी १९४२ च्या चले जाव आंदोलनात, संयुक्त महाराष्ट्र चळवळीत आणि गोवा मुक्ती संग्रामातही सक्रिय सहभाग घेतला. तसेच चिनी आक्रमणाच्या वेळी अंतर्गत सुरक्षिततेसाठी ७०,००० होमगार्ड त्यांनी तयार केले. श्री. मोहिते यांनी महाराष्ट्रात समाजकारण, शेती, सहकार या क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय योगदान दिले आहे. १९५४ मध्ये स्थापन केलेल्या कृष्णा सहकारी कारखान्याचे ते संस्थापक अध्यक्ष होते. कोयना धरणाची निर्मिती, कापूस एकाधिकार योजना, मुंबई हाऊसिंग बोर्डाची निर्मिती करण्यामध्ये त्यांचा मोलाचा वाटा होता. ग्रामीण भागाच्या विकासासाठी त्यांनी "गाव तिथे रस्ता व रस्ता तिथे एसटी" योजना सुरू केली. कामगारांना घरे मिळावीत म्हणून मुंबई घरदुरुस्ती व पुनर्बांधणी मंडळाची स्थापना करणे, "कसेल त्याची जमीन" ही घोषणा करून कूळ कायदा अमलात आणणे असे अनेक लोकोपयोगी निर्णय त्यांनी आपल्या मंत्रीपदाच्या कालावधीत घेतले. त्यांनी सहकारी साखर कारखान्यांबरोबर सहकारी बँका, पतसंस्था, कृषि उद्योग, शिक्षण संस्था स्थापन करून सहकाराचा नवा आदर्श महाराष्ट्रात निर्माण केला. त्यांनी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रात दिलेल्या अतुलनीय योगदानाबद्दल त्यांना राजर्षी शाहू पुरस्काराने तसेच डी. लिट. पदवीने सन्मानित करण्यात आले.

श्री. मोहिते सन १९५२, १९५७, १९६२, १९६७, १९७२ व १९७८ असे सहा वेळा सातारा जिल्हातील कराड मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेवर निर्वाचित झाले होते. १९८० मध्ये कराड मतदारसंघातून ते लोकसभेवरही निर्वाचित झाले होत. कै. मोहिते यांनी १९६० ते १९८० या काळात गृह व कृषी खात्याचे उपमंत्री तसेच गृह, कृषी, गृहनिर्माण, सहकार, अन्न व नागरी पुरवठा, परिवहन आणि अर्थ यासारख्या विविध खात्यांचे मंत्रीपदही भूषविले होते. श्री. मोहिते हे स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील महत्त्वाचा दुवा होते. अर्थ, सहकार, शिक्षण आणि राजकारणातील अध्वर्यु म्हणून ते ओळखले जातात.



## विधानसभेच्या कार्यवृत्तातील निवडक संस्मरणपुष्प...

**श्री. अशोक चव्हाण (मुख्यमंत्री) :** कै. मोहिते यांनी १९४२ च्या चले जाव आंदोलनात, संयुक्त महाराष्ट्र चळवळीत तसेच गोवा मुक्ती संग्रामातही सक्रिय भाग घेतला. तर चिनी आक्रमणाच्या वेळी अंतर्गत सुरक्षिततेसाठी सत्तर हजार होम गार्डस त्यांनी तयार केले होते. त्यांना स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील दुवा तर अर्थ, सहकार राजकारण आणि समाजकारणातील अध्वर्यू म्हणून ओळखले जाते. त्यांना कापूस एकाधिकार योजना व मुंबई हाऊसिंग बोर्डाचे जनक म्हटले जाते. त्यांनी ग्रामीण भागाच्या विकासासाठी "गाव तिथे रस्ता व रस्ता तिथे एस. टी." सुरू केली. तसेच कामगारांना घरे मिळावीत म्हणून मुंबई घरदुरुस्ती व पुनर्बांधणी मंडळाची स्थापना केली. तसेच "कसेल त्याची जमीन" ही घोषणा करुन कुळ कायदा अंमलात आणला, तर १९७५ मध्ये कमाल जमीन धारणा कायदा अंमलात आणण्यासाठी स्वतःच्या मालकीच्या २३ हेक्टर जमिनीचा कोणताही मोबदला न घेता वाटप केले.

**श्री. एकनाथराव खडसे-पाटील (विरोधी पक्षनेता) :** महाराष्ट्राच्या सहकाराला खरे वळण व दिशा देण्याचे महत्त्वाचे व जोमदार काम स्व. यशवंतराव मोहिते यांच्या कालखंडात झाले. त्यांच्या कालखंडात त्यांनी घेतलेल्या धोरणांच्या माध्यमातून सहकाराला दिशा देण्याचे महत्त्वाचे काम झालेले आहे. म्हणूनच राज्यात सगळ्या क्षेत्रात सहकार पोहोचला. जीवनामध्ये असे एकही क्षेत्र नसेल की, त्याठिकाणी सहकार पोहचलेला नाही किंवा सहकारी संस्था पोहचलेल्या नाहीत. यासंदर्भातील बहुमूल्य योगदान कै. यशवंतराव मोहितेंचे आहे. शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये क्रांती निर्माण व्हावी या दृष्टीकोनातून कापूस एकाधिकार योजनाही सुरू केली गेली. ती योजना नंतर हिंदुस्थानमध्ये अग्रणी ठरली.

**श्री. सुभाष देसाई (गोरेगाव) :** त्यांनी अगदी मूलगामी विचार करून, तळागाळातील माणसांचे जीवन कसे बदलता येईल, त्यावर ठोस अशा कल्पना काढून, त्या राबविल्या व यशस्वीपणे पुढे नेल्या.

**श्री. ग. आ. देशमुख (सांगोला) :** कै. यशवंतरावजी मोहिते हे सन १९६०-६१ मध्ये शेतकरी कामगार पक्षातून काँग्रेस पक्षामध्ये गेले. ते जरी काँग्रेस पक्षामध्ये गेले असले तरी महाराष्ट्रामध्ये डाव्या विचारसरणीचे धडाडीचे नेते म्हणून त्यांचा उल्लेख करावा लागेल. ते स्वातंत्र्यसेनानी होतेच, पण संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये त्यांचे फार मोठे योगदान होते. विशेषतः आता उल्लेख केल्याप्रमाणे कापूस एकाधिकार योजना मांडताना, त्यांनी या सभागृहामध्ये जवळ जवळ ७ तास भाषण केलेले होते. गृहनिर्माण खात्यावर बोलतांना मुंबईच्या मोडकळीस आलेल्या इमारतींचे पुनरुज्जीवन करावे, याबाबतीत त्यांनी सभागृहात तासनतास भाषणे केल्याची आठवण मला आजही आहे.



**डॉ. पंतगराव कदम (वने मंत्री) :** कै. यशवंतराव मोहिते हे शेतकरी कामगार पक्षाचे संस्थापक सभासदांपैकी एक होते. विद्यार्थी चळवळीमध्ये त्यांनी काम केले. स्वातंत्र्य लढ्यामध्ये देखील त्यांनी काम केले होते. आवडी येथे समाजवादी समाजरचना काँग्रेस पक्षाने स्वीकारली आणि यासंबंधीचा ठराव स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांनी मांडला होता. त्यानंतर संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाल्यांतर आनंदराव चव्हाण, यशवंतराव मोहिते हे शेतकरी कामगार पक्षाचे प्रमुख नेते काँग्रेस पक्षामध्ये आले. कोयना धरणाच्या संदर्भात प्रदीर्घ असे भाषण श्री. यशवंतराव मोहिते यांनी केलेले आहे. त्यांनी ज्या ज्या खात्याचे मंत्री म्हणून काम केले त्या खात्यांमध्ये स्वतंत्रपणे आगळीवेगळी भूमिका आणि ठोस अशी पावले उचलली.

**श्री. विलासराव पाटील (कराड दक्षिण) :** राजकारणामध्ये, समाजकारणामध्ये नेहमी टीका होत असते. परंतु सार्वजनिक जीवनामध्ये आपले स्वतःचे जीवन स्वच्छ कसे ठेवावे, यासंबंधी समाजाने त्यांचा आदर्श घेणे अतिशय आवश्यक आहे. ते अनेक वर्षे मंत्री म्हणून कार्यरत होते. परंतु मंत्रिपदाच्या कार्यकाळात त्यांच्यावर एकही भ्रष्टाचाराचा आरोप झाला नाही.

**श्री. जयंत पाटील (ग्रामविकास मंत्री) :** आबासाहेबांनी सांगितल्याप्रमाणे डावी विचारसरणी हा त्यांच्या विचाराचा पाया होता. काँग्रेस पक्षात गेल्यानंतर व मंत्री झाल्यानंतर सुद्धा डावी विचारसरणी व कष्टकऱ्यांना न्याय देण्याचा असलेला त्यांचा बाणा त्यांनी कधी सोडला असल्याचे आम्हाला कधी दिसून आले नाही. सत्तेत असो अगर नसो आपले विचार अगदी परखडपणे व प्रखरपणे मांडायचे. तसेच मांडलेल्या विचाराची बैठक पक्की असली पाहिजे असा आग्रह धरणारा हा नेता होता. ते कदाचित राज्याचे मुख्यमंत्री झाले नसतील. परंतु राज्याचे नेतृत्व करण्याची क्षमता असणारी जी नेतेमंडळी होती त्या पिढीतील कै. यशवंतराव मोहिते हे एक महत्त्वाचे नेते होते.

**श्री. बाळासाहेब पाटील (कराड) :** कै. श्री. यशवंतराव मोहिते यांनी सहकार या क्षेत्रामध्ये अतिशय चांगले काम केलेले आहे. कृष्णा सहकारी साखर कारखान्याची स्थापना त्यांनी केली. खऱ्या अर्थाने कृषी क्रांतीचा पाया त्यांच्या हातून रचला गेला. सहकारच्या बाबतीत त्यांचा आदर्श घेऊन सहकार कार्य करणाऱ्यांनी सहकार तत्त्वावर सूतगिरण्या काढल्या.

**श्री. रविंद्र वायकर (जोगेश्वरी-पूर्व) :** यशंवतराव मोहिते यांनी त्यांच्या भाषणामध्ये वेळोवेळी कोयना धरणाच्या बाबतीत उल्लेख केला होता. त्यांनी कोयना धरणाच्या बाबतीत अतिशय महत्त्वाचे काम केले होते. त्याचाच फायदा या मुंबई शहराला पुढे मिळणार आहे.

**श्री. धैर्यशील पाटील (पेण) :** कै. यशवंतराव मोहिते साहेब यांनी अनेक लोकोपयोगी कामे केली आहेत. त्यांचा स्वातंत्र्य चळवळीतील सहभाग असो, किंवा सहकार चळवळीतील योगदान असो, पण विशेषतः "कसेल त्याची जमीन" हा कायदा त्यांनी अंमलात आणला. कै. मोहिते यांनी सहकार क्षेत्राला नवी दिशा दिली.




**श्री. दिलीप वळसे-पाटील (अध्यक्ष):** कै. मोहिते यांनी सहकार क्षेत्राला नवी दिशा दिली. सन १९५४ मध्ये स्थापन केलेल्या कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे ते संस्थापक-अध्यक्ष होते. महाराष्ट्राची भाग्यलक्ष्मी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कोयना धरणाच्या निर्मितीत त्यांचा मोलाचा वाटा होता. कै. मोहिते हे स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील दुवा तसेच अर्थ, सहकार, राजकारण आणि समाजकारण यातील अर्ध्वयू म्हणून ओळखले जातात.

(संदर्भ : विधानसभा कार्यवृत्त - शोक प्रस्ताव दिनांक ११ नोव्हेंबर, २००९)



जन्म : १ ऑगस्ट, १९२०
मृत्यू : १७ जानेवारी, १९८४

## श्री. राजाराम बापू अनंत पाटील

**कार्यकर्त्यांना जपणारे लोकनेते**
**आणि शेतकऱ्यांच्या खातेपुस्तिकेचे निर्माते**

श्री. राजाराम (बापू) अनंत पाटील यांचा जन्म १ ऑगस्ट, १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील कासेगाव येथे झाला. त्यांचे शिक्षण एलएल. बी. पर्यंत झाले होते. सन १९४२ च्या स्वातंत्र्य चळवळीत त्यांनी भूमिगत राहून कार्य केले होते. श्री. राजाराम (बापू) पाटील यांनी १९४५ साली कासेगाव शिक्षण संस्थेची स्थापना करून माध्यमिक शाळा व महाविद्यालये सुरू केली. खेड्यातल्या सामान्य माणसाचे जीवन ज्ञानाच्या पायावर उभे राहिले पाहिजे हा विचार केंद्रस्थानी मानून बापूंनी वाळवा तालुक्यामध्ये शिक्षण संस्थांचे जाळे उभे केले.

अभियांत्रिकी व तंत्रनिकेतन महाविद्यालयांची स्थापना त्यांनी केली, साखराळेच्या उजाड माळ्यावर सहकारी साखर कारखाना सुरू करून त्यांनी शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती बदलण्याचा प्रयत्न केला. शेतकऱ्यांच्या दुधाला योग्य दर बाजारपेठ मिळवून देण्यासाठी त्यांनी इस्लामपूर येथे वाळवा दुग्ध संघाची स्थापना केली शेतकरी हा केंद्रस्थानी मानून सहकाराच्या माध्यमातून त्यांनी साखर कारखाना, सहकारी बँका, दूध संघ, ग्राहक भंडार, सूत गिरणी, पाणीपुरवठा संस्था यासारख्या विविध संस्था उभारून सहकाराचा आदर्श घालून दिला.

श्री. राजाराम (बापू) पाटील यांनी १९५७ मध्ये सांगली जिल्हा कमिटीचे चिटणीस, १९५९-६० मध्ये काँग्रेस महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्षपद भूषविले होते. १९५२ ते ६२ या काळात दक्षिण सातारा जिल्हा लोकल बोर्डाचे ते अध्यक्ष होते. श्री. राजाराम (बापू) पाटील १९६२,१९६७ व १९७२ मध्ये सांगली जिल्ह्यातील वाळवा मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेवर तर १९७८ ते १९८४ या कालावधीत महाराष्ट्र विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते. १९६२ ते १९८० या काळात त्यांनी महसूल, ऊर्जा, उद्योग, ग्रामविकास, विधी व न्याय तसेच माहिती व व जनसंपर्क अशा विविध खात्यांचे मंत्री म्हणून कार्य केले होते. शेतकऱ्यांना उपयुक्त ठरणाऱ्या खाते पुस्तिकेची निर्मिती, उद्योगांना चालना देण्यासाठी औद्योगिक वसाहतींची निर्मिती, शेती उत्पादनांवर आधारित प्रक्रिया उद्योगास चालना देणे असे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय बापूंनी आपल्या मंत्रीपदाच्या कालावधीत घेतले होते.

लोकनेते राजाराम बापू पाटील यांनी सहकार, शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रास दिलेल्या योगदानाबद्दल महाराष्ट्र त्यांची नेहमीच दखल घेईल. सचोटी, न्याय, प्रामाणिकपणा, सामान्य शेतकऱ्यांबद्दल वाटणारा जिव्हाळा, नैतिक मूल्यांची जोपासना, समाज ऋणांची जाणीव आणि




समाजाचे दातृत्व यांचा त्यांनी स्वतःला कधीही विसर पडू दिला नाही. असे ऋषीतुल्य लोकनेते राजाराम बापू यांचे महाराष्ट्र घडविण्यात योगदान आपणा सर्वांच्या कायमस्वरूपी लक्षात राहील.

## विधानसभेच्या कार्यवृत्तातील निवडक संस्मरणपुष्प...

**श्री. वसंतदादा पाटील (मुख्यमंत्री):** कै. राजारामबापू पाटील यांचा जन्म १ ऑगस्ट, १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वडगाव (हवेली) या गावी झाला. १९४२ च्या स्वातंत्र्य चळवळीत त्यांनी भूमीगत राहून कार्य केले. कै. राजारामबापू पाटील यांनी १९४५ साली कासेगाव एज्यूकेशन सोसायटीची स्थापना केली होती. १५ ऑगस्ट, १९४७ स्वातंत्र्यदिनी कासेगाव येथे एक प्रचंड सभा होऊन गावातील सर्व देवालये त्याच दिवशी हरिजनांना खुली करून देण्यात त्यांनी पुढाकार घेतला होता. १९५७ मध्ये सांगली जिल्हा काँग्रेस कमिटीचे ते चिटणीस होते. तसेच १९५८ मध्ये जिल्हा काँग्रेसचे व १९५९-६० मध्ये प्रदेश काँग्रेसचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले. राज्यातील सहकार आणि शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी अतिशय मोलाची कामगिरी बजावली आहे. सन १९६९-७० मध्ये वाळवा सहकारी साखर कारखान्याचे ते अध्यक्ष होते. १९६२ मध्ये महाराष्ट्र विधानसभेचे सदस्य म्हणून प्रथम निवड झाली व उपमंत्री म्हणून मंत्रीमंडळात समावेश झाला. १९६५ मध्ये महसूल खात्याचे कॅबिनेट मंत्री म्हणून नेमणूक झाली. १९७८ मध्ये त्यांची विधानपरिषदेवर निवड झाली. जानेवारी १९८१ मध्ये त्यांची महाराष्ट्र राज्य जनता पक्षाचे अध्यक्ष म्हणून निवड झाली. १९८३ मध्ये त्यांची महाराष्ट्र जनता पक्षाच्या अध्यक्षपदी फेरनिवड झाली व जीवनाच्या अखेरपर्यंत त्यांनी ते पद भूषविले.

**श्री. शरद पवार (बारामती) :** कै. राजाराम बापू पाटील यांच्याशी या सदनातील बहूसंख्य सन्माननीय सदस्यांचा अत्यंत निकटचा संबंध होता. विधायक कार्यकर्त्यांची फळी उभी केली पाहिजे अशा प्रकारची आस असणारे कार्यकर्ते आपल्यातून निघून गेले. १९६० साली ते पश्चिम महाराष्ट्र काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष होते, त्यावेळेस माझ्यासारखे कार्यकर्ते स्वयंसेवक म्हणून त्यांच्या जीवावर काम करायचे. पुणे शहरामध्ये अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीचे अधिवेशन भरले होते त्यावेळेस स्व.पंडित जवाहरलाल नेहरु उपस्थित होते. ते अधिवेशन पार पाडण्यासंदर्भात त्यांनी अत्यंत समर्थपणाने फार मोठी जबाबदारी उचलली होती. १९८० साली शेतकरी आणि शेतमजूरांच्या प्रश्नांबाबत जळगाव पासून नागपूर पर्यंत जाण्याचा कार्यक्रम महाराष्ट्रातील सगळ्या विरोधी पक्षांनी आखलेला होता. त्यावेळेला निघालेल्या दिंडीमध्ये या वयामध्येसुध्दा कोठेही न थकता, कोठेही गाडीमध्ये न बसता सातत्याने चालत जाणारे ते नेते होते.

**श्री. निहाल अहमद (मालेगाव) :** माननीय रा. अ. पाटील जहां भी रहे, जिस पक्ष में भी उन्होंने काम किया हो, वह उन्होंने निष्ठा के साथ किया।




**श्री. हशू अडवाणी (चेंबूर) :** जनता पार्टी की सरकार टूटने के बाद जब गवालिया टैंक पर जनता पार्टी का अधिवेशन हो रहा था, उस समय कार्यकारिणी की मीटिंग खत्म होनें के बाद रात के एक बजे वे गवालिया टैंक पर कार्य कर रहे कार्यकर्ताओं से बात करने की उन्होंने अपने साथियों के पास इच्छा प्रकट की और कहा की उन कार्यकर्ताओं को भी इससे अच्छा लगेगा। तो उन कार्यकर्ताओं से उन्होंने पांच मिनट बात की और उसके बाद वे घर गए। इस तरह से एक साधारण कार्यकर्ता का विचार करने वाले वे एक नेता थे।

**श्री. ल. शि. कोम (जव्हार) :** त्यांच्याबरोबर जे कार्यकर्ते जात त्यांना सहकारी क्षेत्रामध्ये आणि इतर क्षेत्रामध्ये वळवून घेण्याची कला त्यांच्यामध्ये होती.

श्री. बबनराव ढाकणे (पाथर्डी) : सामान्य कार्यकर्त्याला नेत्यांनी कशी वागणूक द्यावी याचे उदाहरण द्यावयाचे झाले तर बापूंच्या जीवनाकडे निर्देश करावा लागेल. त्यांच्या जीवनातील जे अनेक प्रसंग आहेत त्यातून आपल्याला दिसून येईल की, महाराष्ट्रातील सर्वसामान्य कार्यकर्त्यांमधील लहानातील लहान कार्यकर्ता असला तरी त्याला पाठीशी धरून, प्रश्न समजावून घेऊन त्यांचे अश्रू पुसणारे नेते म्हणून ते प्रसिद्ध होते.

**श्री. पी. के. पाटील (शहादा) :** नेता म्हणून कार्यकर्त्यांशी वागण्याची त्यांची हातोटी वाखाणण्याजोगीच होती. ते कधीही कोणावर रागावत नसत, कोणाला भेटले तर हसतमुख रहात. महाराष्ट्रातील जे नेते, कार्यकर्ते एकदा बापूंशी बोलले, त्यांच्या जवळ आले ते कधीही त्यांच्यापासून दूर गेले नाहीत.

**श्री. विश्वासराव पाटील (वाळवा) :** कै. राजारामबापू पाटील यांच्याबाबत बोलावयाचे झाले तर असा उल्लेख करावा लागेल की, ते अजातशत्रूसारखे होते. राजकारणात असा पिंड असलेला माणूस मिळणे ही गोष्ट दुरापास्त आहे. प्लेटोने सांगितल्याप्रमाणे राजकारणी माणूस हा तत्वज्ञानी असला पाहिजे. त्याचप्रमाणे त्यांचे व्यक्तिमत्व होते.

**श्री. गुलाबराव पाटील (अमळनेर) :** मी हाडाचा पत्रकार. असे असताना १९७७ च्या वादळात मी ॲसेम्ब्लीमध्ये आलो. त्यानंतर १९८० साली ज्यावेळी निवडणूक आली त्यावेळी मी वर्तमानपत्रातून असे जाहीर करून टाकले की, मी माझ्या आर्थिक परिस्थितीमुळे निवडणूक लढवित नाही. त्यावेळी मला बापूंनी विचारले की, तुला निवडून येण्याची खात्री नाही काय ? मी त्यांना सांगितले की, मी हमखास निवडून येईन ; परंतु मी आर्थिक परिस्थितीमुळे निवडणूक लढवित नाही; निवडणुकीचा खर्च पेलवणार नाही. त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, तू काहीच काळजी करू नको; मी तुझ्या पाठीमागे आहे. मला या ठिकाणी सांगावयास अभिमान वाटतो की, मी या ठिकाणी येण्यामध्ये कै. राजारामबापू पाटील यांचा आणि मा. शरदराव पवार यांचा सिंहाचा वाटा आहे.

**श्री. शंकरराव जगताप (उपाध्यक्ष) :** सतत हसतमुख राहून मित्र जोडण्याची त्यांची पद्धत, सर्वसामान्य कार्यकर्त्यांमध्ये मिसळण्याची त्यांची पद्धत आपल्याला क्वचितच पहावयास सापडते. त्यांनी जवळ केलेल्या माणसाचा उत्तम पुरावा म्हणजे त्यांच्या मुत्यूनंतर कासेगाव येथे दुःखाकूल माणसांची उडालेली झुंबड. ती शोकाकुल माणसे ढसढसून रडत असताना ज्यांनी




पाहिले त्यांना याची कल्पना येईल. बापूंनी किती लोकांचे प्रेम संपादन केले याबाबत एका गोष्टीची सहज आठवण झाली ते सांगावयास हरकत नाही. या सभागृहाचे नेते माननीय मुख्यमंत्री श्री. वसंतदादा पाटील यांनी सहज बोलताना असे उद्‌गार काढले की, कितीही प्रयत्न केले तरी असा कार्यकर्ता महाराष्ट्रमध्ये पुन्हा घडणे शक्य नाही. मला वाटते की या एका वाक्यामध्ये त्यांच्यासंबंधी खूप काही सांगितले गेले आहे. त्यांचा सर्व पक्षामधील आणि कोणत्याही पक्षात नसलेला असा फार मोठा मित्रगण महाराष्ट्रमध्ये त्यांनी जोडला.

## विधानपरिषद कार्यवृत्तातील निवडक संस्मरणपुष्प...

**श्री. दत्ता मेघे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारे निर्वाचित) :** कै. राजारामबापू पाटील यांनी मंडल आयोगावर जे भाषण केले ते पाहिल्यानंतर आपल्याला असे दिसून येईल की, ते नेतृत्त्व देणारे होते. पश्चिम महाराष्ट्राचा विकास सहकारी चळवळीतून झाला आहे. त्याप्रमाणे विदर्भाचाही व्हावा, मागासलेल्या भागांचा विकास व्हावा यादृष्टीने लोकांना मार्गदर्शन करण्याचे काम अनेक वर्ष त्यांनी या महाराष्ट्र राज्यामध्ये केले.

**श्री. रा. सू. गवई (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारे निर्वाचित) :** क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्त्वाखाली प्रति सरकार निर्माण करून एक नवीन दरारा इंग्रजांच्या राजवटीत त्यांनी निर्माण केला होता. आताचे मुख्यमंत्री आदरणीय श्री. वसंतदादा पाटील, कै. राजारामबापू पाटील, श्री. बापूसाहेब लाड अशा अनेक मंडळींनी जवळजवळ प्रति सरकार निर्माण केले होते आणि महाराष्ट्रामध्ये पत्री सरकार म्हणून ते प्रसिध्द झाले. त्यांनी त्यावेळी पॅरलल सरकार निर्माण केले होते. मंत्रीपद गेल्यानंतर दुसऱ्या दिवशी विधानसभेचे सदस्य असताना संसदीय आयुधांचा अभ्यास करून त्यांचा योग्य वापर राजारामबापू पाटील करीत असत. ते या पवित्र सभागृहाचे सभासद होते. या सभागृहात काही वेळा आक्रमक भूमिका घ्यायचे, सभागृहाची बैठक संपल्यानंतर मात्र त्यांच्या चेहऱ्यावर हास्य प्रगट होत असे.

**श्री. ग. प्र. प्रधान (पुणे विभाग पदवीधर):** कै. राजारामबापू पाटील ज्यावेळी महसूल मंत्री होते त्यावेळेला विरोधीपक्षामध्ये नव्याने आलेला मी एक सदस्य होतो. मला आठवते की, काही मतभेद झाले होते म्हणून मी त्यांच्या चेंबरमध्ये जाऊन फार तीव्रतेने बोललो. त्यावेळेसही बापूंनी अतिशय सौजन्याने त्यांची बाजू मांडली. मी त्यावेळेला फारच रागवलो असल्याने मी त्यांना म्हटले की, तुमच्या काँग्रेस कल्चरने आमच्या विरोधाची धार बोथट होणार नाही. तेव्हा त्यांनी मला म्हटले की, तुमच्या सारख्या पुणेकरांनी माझ्यामध्ये कल्चर आहे, हे मान्य केले हे ही काही थोडे नाही! या आमच्या पहिल्या भेटीमध्ये जी त्यांची ओळख मला पटली ती आयुष्यामध्ये वाढतच गेली आणि त्यांचे मन केवढे विशाल आहे याचा अनेकवेळा मला नंतर प्रत्यय आला.

**श्री. मधु देवळेकर (मुंबई पदवीधर):** राजारामबापूंबद्दल एकूण जे प्रकर्षाने मला जाणवले आणि ज्यामुळे मी भारावून गेला होतो तो गुण म्हणजे अनेक वर्षे सत्तेवर राहिलेला



माणूस जेव्हा विरोधी बाकावर येऊन बसतो, तेव्हा आल्यानंतर पहिल्या दिवसापासूनच कल्याणकारी नेत्याची भूमिका, विरोधीपक्षांच्या कार्यकर्त्यांची भूमिका निभावतो हे पाहून मी फार प्रभावित झालो .

- **श्री. मनोहर जोशी (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) :** सत्तारुढ पक्षाकडून आश्वासन कसे मिळवावयाचे, सत्ताधारी पक्षाला बोचऱ्या शब्दामध्ये कसे बोलावे, कायम स्वरूपात वैर निर्माण होणार नाही अशा प्रकारे कसे बोलावे, याचा आदर्श म्हणून राजारामबापूंकडे पाहिले पाहिजे.

- **श्री. जयंतराव टिळक (सभापती) :** कै. राजारामबापू पाटील यांनी शेतकऱ्यांसाठी एक चांगली गोष्ट केली, ५०-६० लक्ष शेतकरी त्याबद्दल त्यांना दुवा देत असतील. ती गोष्ट म्हणजे खाते पुस्तिका. शेतकऱ्यांच्या जमिनीच्या नोंदी अनेक ठिकाणी नीट होत नसत व त्याचे दुष्परिणाम शेतकऱ्याला भोगावे लागत होते. म्हणून शेतकऱ्यांना खाते पुस्तिका द्याव्यात, त्याच्या जवळ त्यांच्या जमिनीचा उतारा असावा ही शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय मोलाची कामगिरी त्यांनी केली.

(संदर्भ : विधानसभा व विधानपरिषद कार्यवृत्त - शोक प्रस्ताव दिनांक १३ मार्च, १९८४)



जन्म : ५ एप्रिल, १९२०
मृत्यू : ९ जुलै, २००५

## डॉ. रफीक झकेरिया

**ज्येष्ठ विचारवंत, प्रज्ञावंत लेखक आणि हिंदू-मुस्लीम ऐक्याचे प्रणेते**

डॉ. रफीक झकेरिया यांचा जन्म ५ एप्रिल, १९२० रोजी झाला. त्यांचे शिक्षण एम. ए. पीएच. डी. (लंडन) बार-ॲट-लॉ पर्यंत झाले होते. त्यांनी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स या विद्यापीठात मुस्लीम प्रश्नांचा अभ्यास करून डॉक्टरेट प्राप्त केली होती. डॉ. झकेरिया यांनी मुस्लीम समाजाचे शैक्षणिक मागासलेपण घालवण्यासाठी केलेले कार्य अतुलनीय आहे. अत्यंत अभ्यासू विचारवंत आणि प्रगाढ ज्ञान असलेले निधर्मी राजकारणाचे प्रवर्तक असा अनोखा लौकिक डॉ. झकेरिया यांना प्राप्त झाला होता. आंतरराष्ट्रीय स्तरावर यूनोच्या सर्वोच्च व्यासपीठावर आपल्या देशाची बाजू समर्थपणे मांडण्यासाठी डॉ. झकेरिया यांची नेमणूक करण्यात आली होती. देशभरातील हिंदू मुस्लीम बांधवांमध्ये कायम सलोखा टिकून रहावा यासाठी त्यांनी फार मोठे योगदान दिले होते.

डॉ. झकेरिया यांनी स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला होता. भारतीय युवक काँग्रेसचे नेते, मुंबई काँग्रेसचे चिटणीस, अखिल भारतीय व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सदस्य म्हणून त्यांनी उत्तम कार्य केले. मौलाना आझाद एज्युकेशनल ट्रस्टचे चेअरमन, औरंगाबाद येथील मौलाना आझाद महाविद्यालयाचे संस्थापक, इंडो-अरब कल्चरल सोसायटीचे संस्थापक म्हणून त्यांनी कार्य केले होते.

डॉ. झकेरिया यांनी राजकीय तसेच अनेक सामाजिक विषयावर देशी विदेशी वृत्तपत्रातून विपुल लेखन केले. शिक्षण, पत्रकारिता, राजकारण आणि इस्लामी तत्वज्ञान आदी विषयांचे ते गाढे अभ्यासक होते. हिंदू मुस्लीम प्रश्नांवर सातत्याने चिंतन करणारे ते प्रज्ञावंत होते. "अ स्टडी ऑफ नेहरू" "राईज ऑफ मुस्लीम इन इंडियन पॉलिटिक्स", "कॉन्फ्लिक्ट बिट्वीन रीलीजन ॲन्ड पॉलिटिक्स", "इंडियन मुस्लीम्स व्हेर हॅव दे गॉन रॉंग" अशी अनेक साहित्य संपदा त्यांच्या सिद्धहस्त लेखणीतून निर्माण झाली होती. केवळ राष्ट्रीय नव्हेच तर जागतिक पातळीवरील संतुलित विचार करणारा विद्वान अशी त्यांची ओळख होती. भारतातील स्वातंत्र्य आंदोलन, इस्लामचा उदय आणि विकास, इस्लामी तत्वज्ञानाचा मोठा व्यासंग त्यांच्या ठायी होता. त्यांचे ऊर्दू भाषेवर प्रभुत्व असून ते ऊर्दूतील एक प्रतिभावान कवी होते.

डॉ. झकेरिया हे १९६० ते ६२ या कालावधीत महाराष्ट्र विधानपरिषदेचे नामनियुक्त सदस्य होते. १९६२-१९६७ व १९७२ असे तीन वेळा ते औरंगाबाद मतदार संघातून महाराष्ट्र

विधानसभेवर निर्वाचित झाले होते. १९७८-१९८४ या कालावधीत ते राज्यसभेचे सदस्य होते. महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळात महसूल, नगरविकास, आरोग्य, पर्यटन, राजशिष्टाचार अशा विविध खात्यांचे मंत्री म्हणून त्यांनी उत्तम कार्य केले होते.

## विधानसभा कार्यवृत्तातील निवडक संस्मरणपुष्प...

**श्री. विलासराव देशमुख (मुख्यमंत्री)** : मरहुम डॉ. रफिक झकेरिया यांचा जन्म ५ एप्रिल, १९२० रोजी झाला. त्यांचे शिक्षण एम.ए., पीएच.डी. व बार-ॲट-लॉ पर्यंत झाले होते.

मरहुम डॉ. झकेरिया यांनी स्वातंत्र्याच्या चळवळीत भाग घेतला होता. भारतीय युवक काँग्रेसचे नेते, मुंबई काँग्रेसचे चिटणीस, अखिल भारतीय व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सदस्य म्हणून त्यांनी कार्य केले. मौलाना आझाद एज्युकेशन ट्रस्टचे चेअरमन, औरंगाबाद येथील मौलाना आझाद कॉलेजचे संस्थापक व इंडो-अरब कल्चरल सोसायटीचे ते संस्थापक होते.

तल्लख बुद्धीचे विचारवंत, संशोधक व सिद्धहस्त लेखक असणारे ज्येष्ठ राजकारणी अशी त्याची सर्वदूर ख्याती होती. आंतरराष्ट्रीय स्तरावरही युनोच्या माध्यमातून त्यांनी उपयुक्त कार्य केले. शिक्षण, पत्रकारिता, राजकारण व इस्लामी तत्वज्ञान आदि विषयांचे ते गाढे अभ्यासक होते. हिंदु-मुस्लीम प्रश्नांवर सातत्याने चिंतन करणारे ते प्रज्ञावंत होते. "ए स्टडी ऑफ नेहरू", "राईज ऑफ मुस्लीम इन इंडियन पॉलिटिक्स", कॉन्फ्लिक्ट बिटवीन रिलिजन ॲन्ड पॉलिटिक्स, "इंडियन मुस्लिम्स व्हेअर हॅव दे गॉन रॉंग" ही व अन्यही त्यांनी लिहिलेली पुस्तके विशेष गाजली.

**श्री. नारायण राणे (विरोधी पक्षनेता)** : डॉ. झकेरिया साहेबांनी देशभरातील हिंदू आणि मुसलमानांमध्ये बंधू भावाची शिकवण दिलेली आहे, तसेच त्यांनी राजकारण, सामाजिक विषयावर देश आणि विदेशातील पुस्तकांमध्ये दर्जेदार लिखाण केलेले आहे. थोर विचारवंत, संशोधक, लेखक, राजकारणी अशी त्यांची ख्याती होती. शिक्षण, पत्रकारिता, राजकारण, तत्वज्ञानाच्या संदर्भात ते गाढे अभ्यासक होते.

**श्री. गोपीनाथ मुंडे (रेणापूर)** : डॉ. रफीक झकेरिया यांनी मराठवाड्यातून विधानसभेचे प्रतिनिधित्व केले. ते हिंदू-मुसलमान एकतेचे प्रतीक होते, स्पष्टवक्ते होते, सच्चे राष्ट्रभक्त होते. त्यांनी या देशाचे युनोमध्ये प्रतिनिधित्व केले. विशेषतः पाकिस्तान आणि हिंदुस्थानचा जो संघर्ष होता त्यासंबंधीची बाजू त्यांनी युनोमध्ये अतिशय प्रभावीपणे मांडली. याची इतिहासामध्ये नोंद झाली आहे. मुस्लिम समाजामध्ये स्त्री शिक्षणाला महत्त्व नाही. त्यांनी मुलींना प्रायमरी पासून ग्रॅज्युएटपर्यंत शिक्षण मिळावे म्हणून प्रयत्न केले. एवढेच नव्हे तर राज्यामध्ये एस.एस.सी. पर्यंतचे शिक्षण हे उर्दूमधून मिळत होते, ते पोस्ट ग्रॅज्युएटपर्यंत मिळण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले.




**श्री. ग. आ. देशमुख (सांगोला) :** डॉ. रफीक झकेरिया हे हुशार होते. त्यांनी मुंबई विद्यापीठात एम.ए. च्या परीक्षेत प्रथम क्रमांकासह सुवर्ण पदक पटकाविले होते. इंग्लंड येथे जाऊन त्यांनी पीएच.डी. केली. तेथे ते बॅरिस्टर झाले. इंग्लंडमध्ये विद्यार्थी दशेत असताना तो काळ स्वातंत्र्यपूर्व होता. त्यांनी त्या काळामध्ये विद्यार्थी चळवळीमध्ये आणि स्वातंत्र्य लढ्यासाठी इंग्लंडमध्ये प्रयत्न केलेले आहेत. १९६२ साली प्रथम ते विधानसभेवर निवडून आले आणि १५ वर्षे सरकारमध्ये निरनिराळ्या विभागांमध्ये एक कार्यक्षम मंत्री म्हणून आपला ठसा उमटविला होता. त्यांनी औरंगाबाद आणि मुंबईमध्ये स्थापन केलेल्या संस्थांचा प्रचंड विस्तार झालेला आहे. त्या एकाच संकुलामध्ये निरनिराळी १५ महाविद्यालये उभी आहेत.

**श्री. नरसय्या आडम (सोलापूर शहर-दक्षिण) :** या देशातील मायनॉरिटीसंबंधी डॉ. गोपाल सिंह यांनी १९६० साली अहवाल दिला होता. त्या अहवालाचा मराठीत अनुवाद डॉ. रफिक झकेरिया यांनी करून फार मोठी कामगिरी बजावलेली आहे. ते राष्ट्रीय एकात्मिकतेचे पुरस्कर्ते होते. सध्याच्या परिस्थितीमध्ये हिंदू-मुस्लिम ऐक्य हे महत्त्वाचे ब्रीदवाक्य असून ते त्यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यामध्ये आचरणामध्ये आणले. महाराष्ट्राची जी परंपरा आहे, त्या दृष्टीने हिंदू-मुस्लिम ऐक्याच्या संदर्भात सेक्युलॅरिझमच्या बाबतीत डॉ. झकेरिया यांनी सकारात्मक भूमिका मांडली होती. एवढेच नव्हे तर समाजामध्ये सुद्धा ती भूमिका मांडली जावी असा आग्रह त्यांनी जनता दलाच्या आमदारांसमोर धरला होता.

**श्री. राजेंद्र दर्डा (औरंगाबाद-पश्चिम) :** डॉ. झकेरिया एक प्रसिद्ध इतिहास संशोधक, पुरोगामी व्यक्तिमत्व, शिक्षण तज्ज्ञ होते. तत्कालीन प्रधानमंत्री श्री. लालबहादूर शास्त्री यांनी डॉ. झकेरिया यांना युनोमध्ये झुल्फीकार भुतो यांना उत्तर देण्यासाठी पाठविले होते. त्यानंतर तत्कालीन प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी यांनीसुद्धा त्यांना आखाती देशामध्ये पाठविले आणि त्याही ठिकाणी त्यांनी भारताची बाजू अत्यंत उत्तमप्रकारे मांडली. मौलाना एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून त्यांनी अल्पसंख्याक समाजाला शिक्षण क्षेत्राकडे ओढले. शिक्षणाची सोय त्यांना उपलब्ध करून देण्याचे, त्यांना मुख्य प्रवाहामध्ये आणण्याचे काम डॉ. झकेरिया यांनी केले. ते माझे फ्रेंड, गाईड, फिलॉसॉफर होते.

**श्री. रामदास कदम (खेड) :** "स्वतःसाठी जगला तो मेला, दुसऱ्यासाठी जगला तो खऱ्या अर्थाने जगला". डॉ. झकेरिया यांनी आपले संपूर्ण आयुष्य इतरांसाठी खर्च केले. चंदन जसे झिजून इतरांना सुगंध देते, तसे शेवटच्या माणसापर्यंत विकासाची गंगा पोहचविण्याचे महत्त्वपूर्ण काम, स्वतः कष्ट घेऊन त्यांनी निश्चितपणे केलेले आहे.

**श्री. अनिस अहमद (दुग्ध विकास मंत्री) :** डॉ. रफीक झकेरिया साहब एक स्वतंत्रता सेनानी थे। प्रदेश की आजादी की लडाई में उनका बहुत बडा हिस्सा था। महिलाओं और लडकियों को शिक्षा दिलाने के काम में उन्होंने हमेशा पहल की थी । महाराष्ट्र सरकार



औरंगाबाद में औकाफ की जमीन का सही उपयोग किस तरह से कर सकती है उस संबंध में उन्होने बहुत अच्छा काम किया। झकेरिया साहब एक अच्छे हिस्टोरियन और इस्लामिक स्कॉलर थे । धर्मनिरपेक्षता उनके रग रग में रहा है ।

**श्री. बशीर पटेल (उमरखाडी)** : डॉ. झकेरियासाहब इस देश की वफादारी के लिए बैरुनी मुल्कों के अंदर हिंदुस्थान की जो शान बढायी, इसके सेक्युलरिज्म का जो परचम बनाया। यह वे इंसान थे जो लोगों के दिलों को जोडते थे । सियासत में रहते हुए भी इंसान को इंसान से जोडना यह बडी कमाल की बात है ।

" हजारो मंजिले होंगी और हजारों कारवाँ होंगे,
निगाहें तुमको ढूंढेगी, न जाने तुम कहाँ होंगे" ।

**श्री. बाबासाहेब कुपेकर (अध्यक्ष)** : डॉ. रफीक झकेरिया हे औरंगाबाद मतदार संघातून ३ वेळा महाराष्ट्र विधानसभेवर निवडून आले होते. तसेच ते महाराष्ट्र विधानपरिषद व राज्यसभा सदस्यदेखील होते. त्यांनी महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात वेगवेगळ्या खात्यांमध्ये काम केलेले आहे. ते उच्च विद्याविभूषित होते. त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला होता. डॉ. झकेरिया यांनी हिंदू मुस्लिम बांधवामध्ये सलोखा टिकून राहण्यासाठी अत्यंत चांगल्यारितीने कार्य केले होते. राजकीय सामाजिक विषयावर त्यांनी अत्यंत दर्जेदार लिखाण केले आहे.

## विधानपरिषद कार्यवृत्तातील निवडक संस्मरणपुष्प...

**श्री. हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री)** : मरहुम डॉ. झकेरिया तल्लख बुद्धीचे विचारवंत, संशोधक व सिद्धहस्त लेखक असणारे ज्येष्ठ राजकारणी अशी त्यांची सर्वदूर ख्याती होती. आंतरराष्ट्रीय स्तरावरही युनोच्या माध्यमातून त्यांनी उपयुक्त कार्य केले. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात दोन वर्ष उप मंत्री व तेरा वर्षे आरोग्य, नगरविकास, महसूल, पर्यटन, औकाफ आणि राजशिष्टाचार अशा विविध खात्यांचे मंत्री म्हणून त्यांनी कार्य केले.

**श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता)** : माझ्या दृष्टीने डॉ. झकेरिया यांची इस्लामचे पुरोगामी भाष्यकार म्हणून राज्याला ओळख होती. मौलाना एज्युकेशन सोसायटीमध्ये सर्वधर्मियांना प्रवेश कसा मिळेल यासाठी त्यांचे सतत प्रयत्न चालले होते. खऱ्या अर्थाने सर्वधर्मियांच्या भावनांची ही पावती होती. त्यांना युनोमध्ये एकदा नाही तर तीन वेळा पाठविले होते.

**श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले)** : डॉ. रफीक झकेरिया यांचा औरंगाबादचा कायापालट करण्यात पुढाकार होता. ते पुरोगामी विचारसरणीचे असल्यामुळे समाजासमोर उभे राहण्याची त्यांची पद्धत ही धर्माला धरून नव्हती तर ती विकासाला धरून होती.




**श्री. गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) :** अष्टपैलू व्यक्तिमत्व म्हणून डॉ. झकेरिया हे मूर्तिमंत उदाहरण आहेत. ते मुस्लिम होते, हिंदू-मुस्लिम ऐक्य कायमस्वरूपी टिकेल ही भूमिका सातत्याने डॉ. झकेरिया यांनी मांडली. तीन वेळा युनोमध्ये त्यांनी भारताचे प्रतिनिधित्व केले होते. त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. इस्लामसंदर्भात त्यांनी सुधारणावादी भूमिका मांडली. इस्लाम धर्माच्या संदर्भात त्यांनी स्कॉलर म्हणून मान्यता मिळविली होती.

**श्री. जयंत प्र. पाटील :** डॉ. झकेरिया हे सामाजिक चळवळीचे प्रणेते होते. त्यांनी यासंबंधी चांगल्या प्रकारे लिखाण करून आपल्या बुद्धीची चमक देशातच नव्हे तर विदेशातदेखील दाखवून दिली होती. राजकीय क्षेत्रात विशेषतः मंत्री म्हणून राज्य शासनात काम करताना त्यांनी आपल्या खात्याचा नावलौकिक होईल अशा पद्धतीने काम केलेले आहे.

**प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) :** हिंदू आणि मुस्लीम यांच्याकडे पाहण्याचा डॉ. झकेरिया यांचा दृष्टिकोन जो होता त्याबद्दल मला सांगावेसे वाटते की, मानवी शरीर हे सामंजस्य, समन्वय आणि एकात्मतेचे प्रतीक आहे असे ते मानत होते. जसे माणसाच्या शरीरात डोळे दोन असतात पण दृष्टी एक असते. हात दोन असतात पण टाळी एक वाजते. पाय दोन असतात पण त्याची चाल एक असते. त्याप्रमाणे राज्यातील, देशातील मुस्लिम आणि हिंदू हे दोन डोळ्यांप्रमाणे असले तरी त्यांची दृष्टी मात्र एकच असली पहिजे. दोन हातांची एक टाळी वाजते आणि दोन पाय असले तरी त्यांची चाल मात्र एकजुटीची असते. त्याप्रमाणे या दोन धर्मियांचे वागणे असले पाहिजे ही भावना त्यांची होती. असा एकजिनसी, एकात्मिक समाज निर्माण करण्याचे अत्यंत महत्त्वाचे काम त्यांनी केले.

**श्री. कमलकिशोर कदम (नांदेड स्थानिक प्राधिकारी संस्था) :** औरंगाबाद शहराला आधुनिक करण्याचा मान डॉ. झकेरिया यांच्याकडे जातो. ते उत्कृष्ट प्रशासक होते. डॉ. झकेरिया यांना अरबी, उर्दू, हिन्दी, इंग्रजी इत्यादी अनेक भाषा येत होत्या. सर्व भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. त्यांनी इंग्रजी भाषेतून जे जे लिखाण केले ते अतिशय गाजले आहे. टाईम्स ऑफ इंडियात त्यांनी पत्रकार म्हणून काम केले आहे. उत्कृष्ट पत्रकार म्हणून ते गाजले होते. नियोजनाची दूरदृष्टी, उत्कृष्ट प्रभावी नेतृत्व त्यांच्याकडे होते.

**श्री. शिवाजीराव देशमुख (सभापती) :** डॉ. रफीक झकेरिया हे खऱ्या अर्थाने महाराष्ट्रामध्ये जन्मलेले राष्ट्रीय पातळीवरील सर्व-धर्म-समभाव आणि निधर्मी विचारांचा पुरस्कार करणारे व्यक्तिमत्त्व होते. डॉ. रफीक झकेरिया यांच्या रुपाने अत्यंत अभ्यासू व्यक्तिमत्त्व महाराष्ट्राला मिळाले. त्यावेळच्या मुंबई राज्यामध्ये एम.ए. च्या परीक्षेमध्ये पहिला येण्याचा मान त्यांना मिळाला. त्यानंतरच्या काळात त्यांनी पीएच.डी. करून महाराष्ट्रामध्ये एक कायदेतज्ज्ञ म्हणून आपले व्यक्तिमत्त्व निर्माण केले.




त्यांनी दिलेली शिकवण या पुढील काळात महाराष्ट्रातील सामाजिक, आर्थिक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या हजारो कार्यकर्त्यांनी सातत्याने जपायची ठरविली तर खऱ्या अर्थाने सर्व-धर्म-समभाव या विचारांची नवी उमेद, इर्षा महाराष्ट्रातील सर्वसामान्यांच्या मनात तयार होऊ शकेल.

(संदर्भ : विधानसभा व विधानपरिषद कार्यवृत्त - शोक प्रस्ताव दिनांक ११ व १२ जुलै, २००५)

# थोर नेते, द्रष्टे विचार...

"कापसाच्या धंद्याचे संपूर्णपणे विकेंद्रीकरण करणे, प्रक्रिया करणाऱ्या कारखानदारांची मालकी उत्पादकाकडे आणि कामगाराकडे देणे, मध्यस्थाचे समूळ उच्चाटन करणे, कर्जपुरवठा व मालाची विक्री यांची सांगड घालणे, मालाची विक्री व प्रोसेसिंग यांची सांगड घालून देणे आणि शेतकऱ्यांचा माल जो आहे तो सहकारी संस्थांच्या मार्फत सरकारने गोळा करून प्रोसेस करून विकून त्याचा पैसा शेतकऱ्याला देणे. शेतकऱ्यांची मालकी शेवटपर्यंत शेतकऱ्याकडेच ठेवणे या पाच मूलभूत तत्त्वांच्या आधारे हे विधेयक या ठिकाणी उभे केले आहे."

**– श्री. यशवंतराव मोहिते**

("कापूस एकाधिकार खरेदी योजना" विधेयकाच्या समर्थनार्थ सहकार मंत्री म्हणून विधानसभेत दिनांक २८ सप्टेंबर, १९७१ रोजी केलेले भाषण)

शेतावरील महसुलाची आकारणी त्याच्या उत्पादनक्षमतेच्या आधारावर केली जाते. जमीन मालकाने, स्वकष्टाने व स्वखर्चाने शेताची सुधारणा केली तर त्याची उत्पादनक्षमता वाढेल व त्या मर्यादेपर्यंत त्याच्या आकारातही वाढ होऊ शकेल. पण शेतकऱ्यांना आपल्या जमिनीची सुधारणा करुन तिची उत्पादनक्षमता वाढविण्यास प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने जमीनसुधारणा महसूल आकारापासून मुक्त करण्याचे तत्त्व स्वीकारण्यात आले आहे. सभागृहाला या विधेयकात विवाद्य अशी कोणतीही बाब सहसा आढळणार नाही अशी मला आशा आहे. हे विधेयक संमत झाल्याने संपूर्ण महाराष्ट्र राज्याला एक समान व सर्वंकष असा जमीन महसूल कायदा लागू करण्याची शासनाची फार दिवसांची इच्छा मूर्त स्वरुपाला येईल.

**– श्री. राजाराम बापू पाटील**

("महाराष्ट्र जमीन महसूल विधेयक" मांडताना महसूल मंत्री म्हणून त्यांनी दिनांक २९ नोव्हेंबर, १९६५ रोजी सभागृहात केलेले भाषण)

"It has taken us more than five thousand years to reach the present figure of 50 Crores and as the rate is going up, if we do not put a check, according to statisticians, within the next 28 years it will be 100 crores... Today the position is that, as compared to the population in the world, our ratio is 14:8 and the land available for human habitation and use, as compared to the rest of the world, is barely 2.6, which means that an Indian would get 7 times less land to live on this planet than what an average human being would... It should be taken up as a crime against the nation to speak against family planning, since the problem has become so serious. We will have to take steps in that direction if we do not want, in the years to come, to neutralise county's developmental activities and all the ideals our people completely. We have to bear this in our mind. And it is in that spirit that this particular circular and the policy of the Director of Public Health has to be taken..."

**– Dr. Rafiq Zakeriya**

(कुटुंब नियोजन विभागातील कर्मचाऱ्यांना अनुलक्षून काढलेल्या परिपत्रकाच्या संदर्भात सार्वजनिक आरोग्य मंत्री म्हणून दिनांक ११ जुलै १९६७ रोजी विधानसभेत दिलेले उत्तर)

## थोर नेते, द्रष्टे विचार...

"महाराष्ट्र राज्यातील सिंचन समादेशात येणाऱ्या जमिनीची भारतीय संघराज्याच्या इतर घटक राज्यांतील तत्सम जमिनीशी तुलना करता, महाराष्ट्र राज्यातील सध्याचे प्रमाण सर्वात कमी असल्याचे दिसून येते. म्हणूनच पाटबंधाऱ्याचे पाणी पुरविणे अत्यंत निकडीचे झाले आहे. त्याचबरोबर अवर्षण व पावसाचा लहरीपणा यामुळे निर्माण होणारी धान्यटंचाई व दुष्काळी परिस्थिती यांपासून राज्यातील काही विशिष्ट भागातील विस्तीर्ण भूप्रदेशांचे संरक्षण करण्यासाठी त्या भूप्रदेशांना अत्यंत निकडीने पाटबंधाऱ्याचे पाणी पुरविणे हाच एकमेव उपाय आहे. जलसिंचन प्रकल्प तयार करण्याच्या बाबतीत घाई केल्यास खर्च फुकट जाऊन तो बहुधा निरुपयोगी ठरतो त्यामुळे एखाद्या जलसिंचन प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम सुरु करण्यापूर्वी त्याची तपशीलवार आखणी करणे अत्यंत आवश्यक आहे."

**– श्री. शंकरराव चव्हाण**

(पाटबंधारे आणि वीजमंत्री श्री. शंकरराव चव्हाण यांनी दिनांक ७ डिसेंबर, १९६४ रोजी सिंचन आयोगाच्या शिफारशींवर विधानसभेत केलेल्या निवेदनातील सारांश)

## ★ मार्गदर्शन आणि प्रेरणा ★



**श्री. रामराजे नाईक-निंबाळकर**
**मा. सभापती**
**महाराष्ट्र विधानपरिषद**



**श्री. नाना पटोले**
**मा. अध्यक्ष**
**महाराष्ट्र विधानसभा**



**श्री. उद्धव ठाकरे**
**मा. मुख्यमंत्री**
**महाराष्ट्र राज्य**



**श्री. अजित पवार**
**मा. उप मुख्यमंत्री**
**महाराष्ट्र राज्य**



**डॉ. नीलम गोऱ्हे**
**मा. उप सभापती**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

## वि. स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र
## महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई


श्री. राजेन्द्र भागवत, सचिव (कार्यभार) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
श्री. निलेश मदाने, संचालक, वि. स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र
श्री. बा. बा. वाघमारे, ग्रंथपाल, माहिती व संशोधन अधिकारी

प्रकाशन : ११ मार्च, २०२०

रचना व मुद्रण : शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई